MHAH170007712023

## विशेष दिवाणी दावा क्र.२५/२०२३ मधील नि.१२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कैफियत देण्यास झालेला उशीर माफ होऊन त्यांनी दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी याकरीता दिलेला आहे. प्रतिवादींनी अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी जाणून बुजून उशीर केलेला नाही. प्रतिवादी हे अडाणी व अशिक्षित असल्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्रे वेळेत मिळून आली नाही. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना झालेला उशीर माफ होऊन मिळावा व त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

२. वादीने सदर अर्जाच्या मागे त्यांचे म्हणणे दिले असून त्यांनी प्रतिवादीचे कथन नाकारले आहे. प्रतिवादीने जाणूनबुजून उशीराने कैफियत दिली असून प्रतिवादीकडून रक्कम रु.१,०००/– खर्च आकारण्यात यावा असे म्हणणे मांडले आहे.

३. अर्ज,वादींचे म्हणणे व दाव्याच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.२ला दि.१२.०५.२०२३ रोजी दाव्याचे समन्स लागले असून प्रतिवादी हे दाव्यात हजर झाले नाहीत. त्यांना कोणते कागदपत्रे मिळून आली नाहीत याबाबत त्यांनी काही कथन केले नाही. त्यामुळे अर्जामध्ये दिलेले कारण योग्य व संयुक्तीक असल्याचे दिसून येत नाही. परंतू दाव्याचा विषय आणि सदर प्रतिवादीचा त्याच्याशी असलेला संबंध विचारात घेवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे न्याय योग्य आहे. जेणेकरुन दोन्ही पक्षांमधील वाद गुणदोषावर निकाली काढता येईल. परंतु त्याचवेळी झालेला विलंब पहाता प्रतिदाव्यातील प्रतिवादीकडून खर्च आकारणे उचित आहे. करीता वरील विवेचनावरुन खालील आदेश करीत आहे.

### : **आदेश** :

१. प्रतिवादी क्र. १ व २ चा अर्ज खर्च प्रत्येकी रक्कम रु.३००/– आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. खर्च पुढील तारखेपर्यंत भरल्यानंतरच लेखी कैफियत स्वीकारली जाईल याची नोंद घ्यावी.

राहाता.
दि.१२.०९.२०२३.

( आदिती आर. नागोरी )
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
**राहाता.**